1


# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) (Formerly Solapur University)

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

©: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in

ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०


**परिपत्रक क्र. - ०२/२०२०**

सर्व संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संकुले विद्यापीठ परीसर येथील प्राचार्य / संचालक/ विभागप्रमुख यांना या परिपत्रकाव्दारे आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ८८ मधील तरतूदी नुसार विद्यापीठ आयोजित **"मार्च/एप्रिल-२०२०"** या सत्र हंगामातील **सर्व विद्याशाखेच्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा व परीक्षा शुल्काचा तक्ता सोबत जोडला आहे.**

प्रस्तुत परीक्षा शुल्क सर्व संलग्नित महाविद्यालये, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ प्रांगणातील विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निर्दशनास आणावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या परीक्षांच्या वेळापत्रकामध्ये केंद्र/महाराष्ट्र शासन अथवा इतर तांत्रिक, प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात येईल यांची कृपया संबंधितानी नोंद घ्यावी. तरी या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबींची अत्यंत काटेकोरपणे नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामात विद्यापीठास सहकार्य करावे.

**(सीए. श्रेणीक शहा)**
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत-वरीलप्रमाणे**

**संदर्भ क्रं. : पुअहिसोविसो/परीक्षा व मूल्यमापन विभाग/वेळापत्रक/२०२०/213**

**दिनांक :** 10 FEB 2020

**प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

१. मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.

## Date of commencement/Examinations fees of all faculties for March/April - 2020

| | | |
|---|---|---|
| **महत्वाची सूचना :** | १. | **अनुत्तीर्ण** विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क स्विकारताना ज्या विद्यार्थ्यांची ५० टक्के किंवा त्याहून कमी विषय राहतील त्यांना संबंधित परीक्षेच्या एकूण शुल्काच्या ५० टक्के शुल्क आकारण्यात येईल व ५० टक्के पेक्षा जास्त विषयांसाठी संपूर्ण परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. ५० टक्के विषय/पेपर अपूर्णांकात येत असल्यास त्याचे रूपांतर पुढील पूर्णांकात करावे. |
| **उदाहरण** | : | विषय/पेपर यांची संख्या ७ असल्यास त्या विद्यार्थ्यास ४ विषय/पेपरसाठीचे म्हणजेच ५० टक्के शुल्क एकुण शुल्काच्या प्रमाणात आकारले जाईल. |

१) पदवी परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे :

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्यूत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | | महाविद्यालये / विद्यापीठ संकुले यांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा | |
|---|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विलंब शुल्कासहीत | विनाविलंब शुल्कासहीत | विलंब शुल्कासहीत |
| १८/०२/२०२० | २६/०२/२०२० | २७/०२/२०२० | ०२/०३/२०२० |
| | | | --- |

| अ.क्र. | परीक्षा | अ.क्र. | परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. सत्र-१ ते ६ | ५ | बी.एस्सी. (एन्टरप्रीन्युअरशीप) सत्र-१ ते ६ |
| २ | बी.कॉम. सत्र-१ ते ६ | ६ | बी.एस्सी. (ई.सी.एस.) सत्र-१ ते ६ |
| ३ | बी.एस्सी. सत्र-१ ते ६ | ७ | बी.बी.ए. सत्र-१ ते ६ |
| ४ | बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) सत्र-१ ते ६ | ८ | बी.सी.ए. सत्र-१ ते ६ |

२) पदव्युत्तर विधी/वाणिज्य अभ्यासक्रमातील परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे :

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्यूत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | | महाविद्यालये / विद्यापीठ संकुले यांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा | |
|---|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विलंब शुल्कासहीत | विनाविलंब शुल्कासहीत | विलंब शुल्कासहीत |
| २२/०२/२०२० | २७/०२/२०२० | २८/०२/२०२० | ०२/०३/२०२० |

| अ.क्र. | परीक्षा | अ.क्र. | परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | एम.ए. सत्र-१ ते ४ | ६ | एम.ए./एम.कॉम. सत्र-१ ते ४ (विद्यापीठ संकुल) |
| २ | एम.एस.डब्ल्यू. सत्र-१ ते ४ | ७ | डी.बी.एम. सत्र- १ ते २ |
| ३ | एम.कॉम. सत्र-१ ते ४ | ८ | पी.जी.डी.सी.ए. सत्र- १ ते २ |
| ४ | एम.एस्सी. (सर्व) सत्र-१ ते ४ | ९ | बी.एल.आय.एस. सत्र - १ व २ (B.Lib) |
| ५ | एम.सी.ए.(सायन्स) सत्र-१ ते ६ | १० | बी.जे.एम.सी. सत्र- १ व २ (BJMC) |

| अ.क्र. | परीक्षा | अ.क्र. | परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | एल.एल.बी. सत्र-१ ते ६ व बी.ए.एल.एल.बी. सत्र-१ ते १० | ३ | एम.बी.ए. सत्र-१ ते ४ |
| २ | एल.एल.एम. सत्र-१ ते ४ | ४ | एम.सी.ए.(कॉमर्स) सत्र-१ ते ६ |

४) शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्यूत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | | महाविद्यालये / विद्यापीठ संकुले यांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा | |
|---|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विलंब शुल्कासहीत | विनाविलंब शुल्कासहीत | विलंब शुल्कासहीत |
| २२/०२/२०२० | २७/०२/२०२० | २८/०२/२०२० | ०२/०३/२०२० |

| अ.क्र. | परीक्षा | अ.क्र. | परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | बी.एड. सत्र-१ ते ४ | ३ | एम.एड. सत्र-१ ते ४ |
| २ | बी.पी.एड. सत्र-१ ते ४ | ४ | एम.पी.एड. सत्र-१ ते ४ |

५) अभियांत्रिकी विद्याशाखेच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा नंतर कळविण्यात येतील :

3

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## सूचना

| | |
|---|---|
| १. | **परिपत्रक क्र. सोविसो/परीक्षा/आवक-जावक/२०१४-१५/२१५६, दि. ०१/०१/२०१५** नुसार अंतिम वर्षास प्रथमत: परीक्षेस बसणा-या सर्व विद्याशाखाच्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कासोबतच Provisional Certificate Fees रु. ५०/- इतकी जादाची घेण्यात यावी. या बाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. **व** जर संबंधित (सर्व अभ्यासक्रमातील) विद्यार्थी शेवटच्या वर्षातील सत्र ५/६ मध्ये अनुत्तीर्ण झाला असेल व त्याने यापूर्वी सदरची फी भरली असेल तर पुन्हा सदरची फी घेवू नये. मात्र ज्या विद्यार्थ्यांने यापूर्वी फी भरलेली नसेल त्यांनी मात्र भरणे आवश्यक आहे. |
| २. | **शै.वर्ष २०१५-१६ पासून** बी.एस्सी.भाग-२ (सत्र-४) पाठयक्रमाबरोबर पर्यावरणशिक्षण **(Environmental Studies)** हा विषय **व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लोकशाही व सुशासन (Democracy) हा विषय Semester - II साठी Compulsory** लागू करण्यात आला आहे. |
| ३. | **परीक्षा मंडळाच्या दि.०४/०३/२०१५ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार** पुर्वीच्या परीक्षा शुल्काच्या परिपत्रकानुसार प्रति दिन दंड आकारल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड बसत होता. याचा विचार करता, अतिविलंब शुल्काचा कॉलम काढून टाकण्यात यावा व तो सूचनांच्या स्वरुपात नमूद करण्यात यावा. तसेच अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज सादर करण्याचा कालावधी हा विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखेनंतर ५ दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- असे राहील.<br>**(अ)** त्यानंतर ५ दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- + रु.५००/- असे राहील.<br>**(ब)** त्यानंतर परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- + रु.१०००/- असे राहील.<br>**(क)** परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० दिवसा पर्यंतच परीक्षा अर्ज स्वीकारले जातील त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.<br>**[सर्व सुटटीचे दिवस वगळून]** |
| ४. | कोणत्याही परिस्थितीत मुदतीनंतर परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. |
| ५. | परीक्षा अर्जावर (Prefilled) प्रिंट झालेले विद्यार्थ्यांचे नाव व अभ्यासात असलेले विषय हे काळजीपुर्वक विद्यार्थ्यांकडून व महाविद्यालयीन प्रतिनिधी कडून तपासणी करण्यात यावी व सदर विषयामध्ये काही दुरुस्ती असल्यास परीक्षा अर्ज इनवर्ड (Online Inward) करण्यापुर्वी ऑनलाईन विषय बदल Subject Change करण्यात यावा. (Click on Pre Examination--->Inward Exam form--->Paper Change) तसेच नावातील दुरुस्ती करीता Student Profile द्वारे ऑनलाईन नाव दुरुस्तीची विनंती करावी. (Click on Student Profile-->Add profile correction request-->Click on Personal Detail--> carry necessary correction-->Update the Request) तद्नंतर कोणताही बदल करता येणार नाही कृपया याची नोंद घ्यावी. |
| ६. | जे विद्यार्थी ई-सुविधा (Online) अंतर्गत प्रिफिल (Prefilled) अर्ज भरुन योग्य ते शुल्क विहित मुदतीत महाविद्यालयाकडे जमा करतील अशाच विद्यार्थ्यांचे प्रिफिल अर्ज महाविद्यालयांने ऑनलाईन इनवर्ड करावेत. |
| ७. | एक विद्यार्थी एका पेक्षा जास्त सत्राच्या परीक्षा देणार असेल अशा विद्यार्थ्यांसाठी एकच परीक्षा अर्ज भरणे अपेक्षित असून, असे अर्ज Online Inward करताना सर्व सत्रांचा परीक्षा अर्ज इनवर्ड होईल याची दक्षता घ्यावी. |
| ८. | Online Inward यादी विद्यापीठात जमा करताना Exam Form Submission Report हा Course-wise Option Select करुन सर्व सत्रांकरीता एकत्रित इनवर्ड (Inward List) यादी जमा करावी.<br>**[उदा. बी.ए. (सीजीपीए) या अभ्यासक्रमातील सत्र १ ते ६ करीता एकत्रित रिपोर्ट जमा करावा]** |
| ९. | विद्यार्थ्यांचे परीक्षेचे अर्ज हे Computer Generated स्वरुपाचे असावे. मॅन्यूअल परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| १०. | विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे M.K.C.L. च्या संगणक प्रणालीमध्ये Inward झालेलेच असावेत. |
| ११. | विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करताना विद्यार्थ्यांचे नाव/विषय बरोबर असल्याची खात्री करूनच Inward करून घ्यावेत. नंतर कोणत्याही प्रकारची दुरूस्ती होणार नाही. |
| १२. | ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे Inward झालेले नसतील त्या विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक मिळणार नाहीत त्यामूळे प्रत्येक परीक्षा अर्ज हा Inward होणे अत्यंत आवश्यक आहे व ते करून घेण्यात यावेत. |

| | |
|---|---|
| १३. | परीक्षा अर्ज सादर करताना सोबत Inward Statistics Report (Online) जोडावे. सोबत इतर कोणत्याही प्रकारची यादी स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| १४. | परीक्षेच्या निर्धारीत वेळापत्रकात कोणत्याही कारणास्तव बदल करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल. |
| १५. | प्राचार्यांनी अंध-अपंग विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जासोबतच त्यांना लेखनिक हवा असल्यास त्यासंबंधीचाअर्ज लेखनिकाचा फोटो व इतर बाबींची पुर्तता करावी, अशा विद्यार्थ्यांना सदरची सवलत संबंधित परीक्षा होईपर्यंत (पदवी/पद्व्युत्तर) राहील. लेखनिक व्यक्ती ही शासकीय / निमशासकीय नोकरीस असू नये, तसेच अपंग विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज व एकत्रित परीक्षा अर्ज महाविद्यालयाने स्वतंत्रपणे विद्यापीठास सादर करावेत. |
| १६. | On Line व Off Line (MKCL) चे Printed आवेदन पत्र विद्यापीठाने महाविद्यालयास पुरवठा केल्याने त्याचे शुल्क रू.१० विहित परीक्षा शुल्का व्यतिरिक्त अधिकचे विद्यार्थ्यांना आकारून, रू. ५ विद्यापीठाकडे परीक्षा शुल्का समवेत जमा करावेत व रू ५ महाविद्यालयानी ठेवून घ्यावेत. |
| १७. | अल्प विद्यार्थीसंख्या असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क M. Phil, Ph. D. Course work, M. Ed, M.P.Ed., B. Architecture, M.E., M.C.A. (Engg.), M.C.A. (Science), LL.M., M. Pharmacy इत्यादी अभ्यासक्रमासाठी मागील सत्राच्या अथवा वर्षाच्या एकूण विषयापैकी ५० टक्के पेक्षा कमी किंवा ५० टक्के पेक्षा जास्त विषय गेले असल्यास संबंधीत अभ्यासक्रमाचे पूर्ण शुल्क आकारण्यात येईल. |
| १८. | परीक्षा विभागातील परिपत्रके, परीक्षा अर्ज भरण्यासंबंधीचे प्रकटन / निवेदन, विविध परीक्षांची कार्यक्रमपत्रिका, परीक्षा केंद्राची यादी व परीक्षांची वेळापत्रके इत्यादी बाबी टपालाव्दारे न पाठविता विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्यामुळे महाविद्यालयाने वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. |
| १९. | परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक संबंधित परीक्षेच्या किमान १५ दिवसापूर्वी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. |
| २०. | **बहि:स्थ विद्यार्थ्यांच्या परीक्षा उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणेच सुरू होतील.** |
| २१. | मार्च/एप्रिल-२०१९ मधील ज्या संबंधित विद्यार्थ्यांचे निकाल UM/RR/EHB/Sub.Change/Wrong Seat No./Pattern Change/No Eligibility/Present चे Absent इत्यादी कारण्यास्तव प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत असे आवेदन पत्र विद्यापीठाकडून प्रक्रिया पूर्ण होताच त्वरीत ज्या-त्या संबंधित विभागाकडे ८ दिवसाच्या आत स्वतंत्ररित्या जमा करावेत. |
| २२. | **जे विद्यार्थी C. G. P. A. या जुन्या पॅटर्नचे आहेत,** अशा विद्यार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमातील समकक्ष विषय जे अभ्यास मंडळे विभागाने यापुर्वी कळविल्यानुसार परीक्षा अर्ज सादर करावा व त्याप्रमाणे नवीन समकक्ष विषयाची परीक्षा देणे गरजेचे आहे. या बाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. |
| २३. | अभ्यासक्रमात झालेल्या बदलामुळे ज्या अभ्यासक्रमाचे वेळापत्रक उपलब्ध नाही (उदा. C.G.P.A.) अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर Hall Ticket वर जुन्या विषयासमोर वेळ व तारीख दर्शविली जाणार नाही परंतु त्यांनी नवीन अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा द्यावी. या करीता संकेतस्थळावरील उपब्लध असलेल्या वेळपत्रकाचा उपयोग करावा या बाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. |
| २४. | ज्या विद्यार्थ्यांच्या जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे दोन संधी संपलेल्या असतील त्यांनी नविन समकक्ष विषयाचा परीक्षा अर्ज सादर करने व परीक्षा देणे अनिवार्य आहे. तांत्रिक त्रुटीमुळे जर Exam form/Hall-ticket वर जुन्या अभ्यासक्रमाच्या विषयांचे शीर्षक (Title) प्रिंट झालेले असतील तरी या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नविन समकक्ष विषयाची परीक्षा देणे अनिवार्य असेल. ही बाब सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. |
| २५. | महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण (Internal Marks/CA Marks/TW Marks/ICA Marks/ Practical Mark/Seminar Marks/P.E. Marks/Oral Marks) त्या-त्या अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा सुरु होण्यापुर्वी संगणक प्रणाली मध्ये (Online) नोंदवावीत व कॉलेज लॉगईनव्दारेच Data export करण्यापूर्वी योग्य गुणांची नोंद संगणकात झाली असल्याची खात्री करावी. |
| २६. | ज्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी Barcode उत्तरपत्रिकेचा उपयोग केला जाणार आहे अशा विद्यार्थ्यांना पुरवणी (Supplement) मिळणार नाही. या बाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. |
| २७. | सर्व संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमातील विद्यार्थीचे ऑनलाईन भरण्यात आलेले व ऑनलाईन इनवर्ड केलेले परीक्षा अर्ज (Hard Copy of Exam Form) आपल्या महाविद्यालयातच ठेवण्यात यावेत व या परीक्षा अर्जांचा ऑनलाईन इनवर्ड रिपोर्ट (Summary) फक्त विद्यापीठ कार्यालयात सादर करावा. |
| २८. | **विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले परीक्षा अर्ज हे दैनंदिन ऑनलाईन इनवर्ड करण्यात यावेत.** तसेच, परीक्षा अर्ज ऑनलाईन इनवर्ड झाले किंवा नाही याची शहानिशा करावी. म्हणेजच जितक्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत तितके अर्ज इनवर्ड झाले की नाही याची पडताळणी करावी तद्नंतरच सदर इनवर्ड रिपोर्ट विद्यापीठाकडे जमा करावा. कोणत्याही परिस्थितीत सांकेतांकावर (Manually Seat Number) विद्यार्थ्यांस परीक्षेस बसू देवू नये. |